उपआयुक्त (झोनिपु) कार्यालय
पुणे महानगरपालिका
जा.क्र. झोनिपु/ ३१३६६
दिनांक – २९/०६/२०१७

## कार्यालयीन परिपत्रक

विषय – Online RTI बाबतदि. १ जुलै २०१७ रोजी दुपारी ३.०० वा. आयोजित करण्यात आलेले प्रशिक्षण.
संदर्भ – माहिती व तंत्रज्ञान विभागाकडील दि.२९/६/२०१७ रोजीचा ई–मेल.

मे. महाराष्ट्र शासनाने सुरू केलेल्या "Aaple Sarkar Project" अंतर्गत online RTI application https://rtionline.maharashtra.gov.in/RTIMIS या संकेत स्थळावर केले जातात. या संकेतस्थळावर पुणे महानगरपालिकेशी संबंधित माहिती अधिकार अर्ज व प्रथम अपिल अर्ज प्राप्त होतात. त्यानंतर सदर अर्ज पुणे महानगरपालिकेच्या संबंधित खात्यांना कार्यवाहीसाठी ऑनलाईन पाठविण्यात येतात

पुणे महानगरपालिका स्तरावर सदर प्रकल्पांतर्गत माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या अंमलबजावणीसाठी शासनामार्फत उपआयुक्त (झोनिपु) यांना नोडल ऑफिसर म्हणून व सर्व खातेप्रमुख यांना ब्रँच युजर म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. त्यानुसार पुणे महानगरपालिकेशी संबंधित https://rtionline.maharashtra.gov.in/RTIMIS या संकेत स्थळावर प्राप्त Online RTI अर्जाबाबत आपल्या विभागासाठी आपले User Name आणि Password आपणास कळविण्यात आले आहेत. त्यानुसार आपल्या विभागाशी संबंधित Online RTI अर्ज User Name आणि Password वापरून अर्ज तात्काळ निर्गत करणेबाबत सूचित करण्यात आलेले आहे.

https://rtionline.maharashtra.gov.in/RTIMIS या संकेत स्थळावर प्राप्त Online RTI अर्जाची कार्यवाही करणेसाठी संकेतस्थळाचा वापर करावयाचे **तांत्रिक प्रशिक्षण माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत शनिवार दि. १ जुलै २०१७ रोजी दुपारी ३.०० वा. घोलेरोड आर्ट गॅलरी येथील कॉम्प्युटर लॅब येथे आयोजित केलेले आहे.**

तरी आपल्या विभागाकडील जन माहिती अधिकारी आणि Online RTI बाबत संगणकीय कामकाज करणारे कर्मचारी यांनी प्रशिक्षणास न चुकता उपस्थित रहावे.

२९.६.
(संतोष भोर)
उपआयुक्त (झोनिपु) तथा
समन्वयक माहिती अधिकार
पुणे महानगरपालिका

प्रत – मा. सर्व खातेप्रमुख, पुणे महानगरपालिका